दिनांक २९/०८/२०२३

**-// प्रेसनोट //-**

**लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर गु.र.क्र. ५८/२०२३ कलम ४५४,४५७,३८० भा.द.स. या गुन्हयातील पाहिजे आरोपीतास अटक केलेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर. |
| २ | गु.र.क्र. व कलम | ५८०/२३ कलम ४५४,४५७,३८० भा.द.वि. |
| ३ | गुन्हा घ. दि. व वेळ | दिनांक १५/०७/२०२३ रोजी २०.२० ते दिनांक १६/०७/२०२३ रोजी १०:४६ वाजेपर्यत. ००.४० वा. |
| ४ | गुन्हा नोंद दि. व वेळ | दिनांक १७/०७/२०२३ रोजी ०१.३० वा. |
| ५ | चोरीस गेलेली मालमत्ता | रेडींग्टन इंडिया लिमेटेड या कंपनीचे ॲपल कंपनीचे आयफोन १३, आयफोन १४, आयफोन १४ प्रो या मॉडेलचे वेगवेगळया रंगाचे एकुण १०५ मोबाईल हॅण्डसेट व ०१ मोबाईल चार्जिग पावर ॲडॉप्टर एकुण किंमत ६५,६१,७४४/- रुपये. |
| ६ | आरोपी अटक | तोफाजुल खुरशेद शेख, वय ३२ वर्षे, धंदा मच्छी विक्री, राठी मु.पो. बोलटोली, पोलीस ठाणे नादानगर, जि. साहेब गंज,राज्य झारखंड. |
| ७ | तपासी अधिकारी | पोलीस निरीक्षक सुनील पवार |

दिनांक १५/०७/२०२३ रोजी रात्रौ ०९:२० वाजेपासुन ते दिनांक १६/०७/२०२३ रोजी सकाळी १०:४६ वाजेपर्यत प्रो कनेक्ट चेन सोल्युशन लि. कंपनीचे गट नं. ९२३, सिमा वेअर हाऊस, काळे ओढा, केसनंद रोड, वाघोली, पुणे येथील वेअर हाऊस मधील छताचे सिमेंटचा पत्रा फोडून त्यावाटे वेअर हाऊसमध्ये प्रवेश करुन वेअर हाऊस मधील रेडींग्टन इंडिया लिमेटेड या कंपनीचे ॲपल कंपनीचे आयफोन १३, आयफोन १४, आयफोन १४ प्रो या मॉडेलचे वेगवेगळया रंगाचे एकुण १०५ मोबाईल हॅण्डसेट व ०१ मोबाईल चार्जिग पावर ॲडॉप्टर एकुण किंमत ६५,६१,७४४/- रुपये चा माल चोरुन नेला म्हणुन लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर, गु.र.क्र. ५८०/२३ कलम ४५४,४५७,३८० भा.द.वि. अन्वये दिनांक दिनांक १७/०७/२०२३ रोजी ०१.३० वाजता गुन्हा नोंद करण्यात आला होता.

खंडणी विरोधी पथकातील म.स.पो.नि. सोनाली भारते यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, नोंद गुन्हयातील पाहिजे आरोपी हा दाणा बंदर, मस्जिंद बंदर, मुंबई या ठिकाणी येणार आहे. त्याप्रमाणे पो.ह.क्र. ३३१२८/सुर्वे, पो.ह.क्र. ०४१२००/तोडकर, पो.शि.चा.क्र. ०७१६२४/ गिडगोळ यांनी नमुद परिसरात शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन कक्ष कार्यालयात आणुन त्याचेकडे नोंद गुन्हयाबाबत तपास केला असता त्याचा नोंद गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास नमुद गुन्हात ताब्यात घेवुन लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, मुंबई श्री. फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशी कुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) राज तिलक रौशन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, डी (विशेष) श्री. दत्तात्रय नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकातील व.पो.नि. ज्ञानेश्वर गणोरे, पो.नि. सुनिल पवार, म.स.पो.नि. सोनाली भारते, पो.ह.क्र. ३३१२८/संतोष सुर्वे, पो.ह.क्र. ३२३०४/संदीप ब्रिद, पो.ह.क्र. ०३०३९५/ निलेश कंद, पो.ह.क्र. ०४०६६६/रोहन सुर्वे, पो.ह.क्र. ०४१२००/अमोल तोडकर, पो.शि.चा.क्र. ०७१६२४/ गिडगोळ व पथक यांनी पार पाडलेली आहे.